# थोडक्यात

## सायबर सुरक्षितता जागरूकता उपक्रम

मुंबई : क्विक हील या जागतिक सायबर सिक्युरिटी कंपनीने सीएआर उपक्रमाच्या माध्यमातून मुंबईमध्ये 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्डस्'चे आयोजन केले. यात सायबर सुरक्षेविषयी समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी काम करणाऱ्या शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि चार सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले. अंधेरी येथील वालिया कॉलेजमध्ये हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला.